करोना 2020/सूचनां/आदेश क्र. 922


महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक:- 02141-222118/222097/222001 फॅक्स क्रमांक: 02141-222025/227451
Email: collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com


---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. 4/04/2020

***अतितात्काळ***

वाचले:- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005

2) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,1897

3)महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, 1897 ची नियमावली दि.14/03/2020 नूसार महाराष्ट्र कोव्हीड-19 उपाययोजन नियम,2020

---

**आदेश**

उपोद्घातातील क्र.3 अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांनी कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंध कायदा, 1897 दि.13/03/2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदींनूसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसचूनेच्या नियम,10 नूसार जिल्हाधिकारी रायगड यांना रायगड जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी कोव्हीड-19 या आजाराकरीता उपचार करतांना वैद्यकीय तज्ञ,डॉक्टर्स यांना N-95 व ट्रिपल लेअर मास्क पुरविण्याकरीता मे.व्हिनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि. तळोजा, ता.पनवेल यांना हापकिन बायो फार्मा. कॉर्पोरेशन मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

ज्याअथी, असे निदर्शनास आले आहे की, विविध जिल्हयाकडून N-95 व ट्रिपल लेअर मास्क पुरविण्याकरीता मे.व्हिनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि. तळोजा, ता.पनवेल यांचेकडे थेट मागणी करण्यांत येते.

ज्याअर्थी हापकिन बायो फार्मा. कॉर्पोरेशन मुंबई ही नोडल संस्था आहे. आणि ज्याअर्थी या सर्व बांबींवर नियत्रण आणणे आवश्यक असून मागणीप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे कोव्हीड-19 आजार प्रतिबंधासाठी पुरवठा होणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी, श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी, रायगड तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड, मला उपोद्घातातील अ.क्र.3 कडील नियम 10 मध्ये नमूद केल्याप्रमाणे करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी अधिकार प्राप्त झाला आहे. त्याचा वापर करुन असे आदेश देत आहे की, मे.व्हिनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि.तळोजा,ता.पनवेल,जि.रायगड,N-95 व ट्रिपल लेअर मास्क पुरविण्याकरीता मागणी स्विकारेल व ही सर्व मागणी हापकिन बायो फार्मा. कॉर्पोरेशन मुंबई यांना कळवेल आणि त्याचा पुरवठा हापकिन बायो फार्मा. कॉर्पोरेशन मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे करेल असे आदेश देण्यांत येत आहेत. याकामी श्री.लक्ष्मण दराडे,सहा.आयुक्त,(ड्रग),अन्न व औषध प्रशासन,पेण (मो.क्र. 9867727739/7977041391) यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यांत येत आहे. नोडल अधिकारी हे दररोज N-95 व ट्रिपल लेअर मास्क यांचे उत्पादन, मागणी व शिल्लक साठा याचा दैनंदिन अहवाल मला सादर करतील.

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यांत यावी. सदरहू आदेशाची अमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन

अधिनियम, 2005 भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,1897 व भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय/कायदेशीर कार्यवाहीस प्राप्त राहिल.

सदरचा आदेश आज दि. /04/2020 रोजी माझे सहि व शिक्क्यानिशी दिला असे.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

**प्रत:- सदरचा आदेश पुढील माहितीस्तव.**

1) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव यांजकडे माहितीसाठी.
2) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांजकडे माहितीसाठी.
3) मा.प्रधान सचिव, अन्न व औषध प्रशासन, यांजकडे माहितीसाठी.
4) मा.विभागीय आयुक्त,कोंकण विभाग, कोंकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी.
5) व्यवस्थापकीय संचालक, हापकिन बायो फार्मा. कॉर्पोरेशन, मुंबई यांना कार्यवाहीसाठी.
6) जिल्हाधिकारी (सर्व)
7) मे.व्हिनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि.तळोजा,ता.पनवेल,जि.रायगड यांना कार्यवाहीसाठी.
8) श्री.लक्ष्मण दराडे,सहा.आयुक्त,(ड्रग),अन्न व औषध प्रशासन,पेण,ता.पेण,जि.रायगड यांना कार्यवाहीसाठी.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग